जनसपर्क अधिकारी
2 3 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'संकटांकडे आव्हान म्हणून पाहा'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**




**नाइट कॉलेज कोल्हापूरच्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. व्यासपीठावर उपस्थित (उजवीकडून) प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील, प्राचार्य एल. एम. गौड, अॅड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व डॉ. सुरेश फराकटे.**

'विद्यार्थी जीवन हा स्वत:ला घडविण्याचा, सिद्ध करण्याचा आयुष्यातील निर्णायक टप्पा असतो. प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत प्रत्येक संकटाकडे आव्हान म्हणून पाहा. सकारात्मक विचार, संयम व दूरदृष्टी ठेवून आव्हानांचे संधीत रूपांतर करा. प्रत्येक काम हे स्वत:ला सिद्ध करण्याची संधी असते. आपण ज्या काळात जगत आहोत, त्याचे भान ठेवून काळावर स्वार व्हा. ध्येय, परिश्रम, काळाचे भान व वेळेचे व्यवस्थापन हीच यशाची चतु:सूत्री आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केले.

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नांदवडेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अॅड. व्ही. एन. पाटील होते. या वेळी डॉ. नांदवडेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत शिक्षण घेत स्वत:चे जीवन कसे घडवले व कुलसचिव पदापर्यंत झेप कशी घेतली, याचा प्रेरणादायी जीवनपट उलगडला.

**कॅम्पस हॅपनिंग्ज**

'नाइट कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रतिकूलतेशी लढण्याचे संघर्षशील मन, जिद्द व शिकण्याचे ध्येय असते. क्रीडा, कला, शिक्षण आदी क्षेत्रात विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळविले आहे. या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व सुविधा देण्यास संस्था कटिबद्ध आहे,' असे मत कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक अॅड. व्ही. एन. पाटील यांनी व्यक्त केले.

प्राचार्य एल. एम. गौड यांनी नाइट कॉलेजमध्ये विद्यार्थिनीही मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. जिमखानाप्रमुख डॉ. सुरेश फराकटे यांनी महाविद्यालयातील वर्षभरातील उपक्रमांचा व शैक्षणिक गुणवत्तेचा अहवाल सादर केला.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा, कला, सांस्कृतिक आदी क्षेत्रांत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. क्रीडा स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर पारितोषिके मिळविलेल्या अभिजीत पोवार, गोविंद फाळके, प्रवीण पाडळकर, सूरज पाटील, प्रवीण गावडे, स्वप्नील येवले, विशाल गुरव, सुचित्रा साळोखे, शार्दूल सले (अॅथलेटिक्स), अनिकेत मोरे (बॉक्सिंग), आकाश भाकरे, उदय पाटील, आकाश जाधव (बास्केटबॉल), शिवाली शिंदे (क्रिकेट) आदी विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

याप्रसंगी डीआरके कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य व्ही. ए. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अक्षता गावडे तर पारितोषिके वाचन डॉ. अरुण शिंदे यांनी केले. आभार डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी मानले. डॉ. सुरेश फराकटे, प्रा. अभिजीत कांबळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 MAR 2017

महाराष्ट्र टाईम्स

# थ्रीडी मॉडेलिंग कोर्स

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात औरंगाबादच्या इंडोजर्मन टूल रुम सहकार्याने 'सॉलिडवर्क्स' या थ्रीडी मॉडेलिंग सॉफ्टवेअरचा शॉर्टटर्म ट्रेनिंग कोर्सला सुरुवात झाली. शॉर्टटर्म ट्रेनिंग कोर्समध्ये ६० विद्यार्थी व शिक्षक सहभागी आहेत. विभागांच्या टेक्विप २ निधीअंतर्गत हा कोर्स आयोजित केला आहे. विद्यार्थ्यांनी स्कील्सचा वापर करून स्वावलंबी व्हावे, ज्ञानाचे उपयोजन उद्योगांचे प्रश्न सोडविण्याकरिता करावे, असे आवाहन प्रा. डॉ. जयदीप बागी केले. प्रा. श्रीकांत भोसले प्रमुख उपस्थित होते. प्रा. हर्षवर्धन पंडित यांनी प्रास्ताविक केले. मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे समन्वयक प्रा. अजित कोळेकर व सुबोध कुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

2 3 MAR 2017 पुढारी जनसंपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. मोरे यांच्याकडून शिवाजी विद्यापीठास एक लाखाची देणगी

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : शहाजी कॉलेजचे निवृत्त प्राध्यापक के. एम. मोरे व कुंदा मोरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाखाचा धनादेश शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्त केला. या देणगीतून येणाऱ्या व्याजामधून विद्यापीठात एम. राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक दिले जाणार आहे. प्रा. मोरे मूळचे उरूण-इस्मालपूरचे आहेत. त्यांचे वडील महादेव मोरे अशिक्षित होते. ते वारकरी संप्रदायातील असल्यामुळे त्यांनी ग्रंथ वाचण्यापुरते ज्ञान संपादन केले. स्वत: अशिक्षित असतानाही त्यांनी आपल्या कुटुंबातील व गावातील इतर मुलांनाही शिक्षण घेण्यासाठी सहकार्य केले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रा. मोरे यांनी एक लाखाची देणगी विद्यापीठास देण्याचा निर्णय घेतला. राज्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना यामधून प्रोत्साहन मिळावे, अशी इच्छाही प्रा. मोरे यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2017

तरुण भारत

# प्रा. के. एम. मोरे यांच्याकडून विद्यापीठास एक लाखाची देणगी

**कोल्हापूर :** शहाजी कॉलेजचे निवृत्त प्राध्यापक के. एम. मोरे व सौ. कुंदा मोरे यांनी आपल्या आई–वडिलांच्या स्मरणार्थ एक लाखाचा धनादेश शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द केला. यातून मिळणाऱ्या व्याजातून एम. ए. राज्यशास्त्र विषयामध्ये विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक दिले जाणार आहे. प्रा. मोरे मूळचे सांगली जिल्ह्यातील उरूण–इस्लामपूरचे असून, त्यांचे वडील महादेव आबाजी मोरे अशिक्षित होते मात्र त्यांनी ग्रंथ वाचण्यापुरते ज्ञान संपादन केले. १०४ वर्षे आयुष्यभर वारकरी जीवन जगलेले महादेव मोरे ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन करीत असत. स्वत: अशिक्षित असले तरी त्यांनी आपली मुले राजाराम, संभाजी, कृष्णाजी आणि मुलींनाही चांगल्या प्रकारे घडवितानाच अनेक युवकांना परिस्थितीशी तोंड देत यशस्वी जीवन कसे जगावे, याचे शिक्षण दिले. याची आठवण ठेवून प्रा. मोरे यांनी शिवाजी विद्यापीठास एक लाखाची देणगी देण्याचा निर्णय घेतला. यामुळे राज्यशास्त्र विषयाचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे, अशी इच्छा प्रा. मोरे यांनी व्यक्त केली.



कै. महादेव मोरे

2 3 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखकाची प्रभावक्षमता तपासणे आवश्यक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'प्रभाव ही संकल्पना व्यापक अर्थाने लेखकाला प्रेरित करत असते. प्रभाव या संकल्पनेकडे निकोप पद्धतीने पाहिल्यास लेखक-कवींचा अन्वयार्थ वेगळ्या पद्धतीने लावता येतो. त्यामुळे काळाच्या टप्प्यांवर लेखक आणि त्यांची प्रभावक्षमता तपासणे साहित्यअभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक ठरते; कारण प्रभावक्षमताच साहित्य समृद्ध करते,' असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात मराठी विभागातर्फे आयोजित 'आधुनिक कवितेवरील' एक दिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस होते.

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे प्रतिपादन**

'सर्जनशीलतेने लिहिणारे लेखक प्रभावमुक्तीची वाट चोखाळत असतात. काळाच्या टप्प्यावर महनीय ठरलेल्या मराठी काव्यपरंपरेचा व प्रभावधारेचा अभ्यास संशोधकांनी केला पाहिजे,' असा सल्लाही डॉ. कोत्तापल्ले यांनी दिला. अध्यक्षस्थानावरून डॉ. राजन गवस यांनी उपस्थित कवींना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, तसेच अनेक कवी, विद्यार्थी उपस्थित होते..

23 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**नागनाथ कोत्तापल्ले : शिवाजी विद्यापीठात आधुनिक कवितेवर चर्चासत्र**

# प्रभाव क्षमतेमुळे साहित्य परंपरा समृद्ध

**कोल्हापूर :** प्रभाव ही संकल्पना व्यापक अर्थाने लेखकाला प्रेरित करीत असते; त्यामुळेच साहित्यपरंपरा समृद्ध होते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे वि. स. खांडेकर भाषाभवन येथे आयोजित 'आधुनिक मराठी काव्यपरंपरा आणि प्रभावक्षमता' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस होते.



शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे बुधवारी वि. स. खांडेकर भाषाभवन येथे आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले. यावेळी डावीकडून प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. राजन गवस उपस्थित होते.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, 'प्रभाव' या संकल्पनेकडे निकोप पद्धतीने पाहिल्यास लेखक-कवींचा अन्वयार्थ वेगळ्या पद्धतीने लावता येतो. या चर्चासत्रात मराठीतील महत्त्वाचे कवी आणि त्यांच्या प्रभावक्षमतेचा विचार करण्यात आला. केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, नारायण सुर्वे, दि. पु. चित्रे, अरुण कोलटकर यांसह नामदेव ढसाळ या कवींच्या प्रभावक्षमतेची मांडणी झाली.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. या चर्चासत्रात कोल्हापूरसह सांगली, सातारा तसेच सीमाभागातील कवी, लेखक व अभ्यासक सहभागी झाले होते.

2 3 MAR 2017 पुढारी जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रभावक्षमता साहित्य परंपरेला समृद्ध करते

## डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रभाव ही संकल्पना व्यापक अर्थाने लेखकाला प्रेरित करते. त्यामुळे काळाच्या टप्प्यांवर महत्त्वाचे लेखक आणि त्यांची प्रभावक्षमता तपासणे हे साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने आणि नव लेखकांसाठी आवश्यक ठरते. प्रभाव आणि परंपरा स्वीकारत, नाकारत अंतर्यामी ऊर्जेने लेखक लिहीत असतात. त्यामुळे प्रभावक्षमता साहित्य परंपरेला समृद्ध करते, असे प्रतिपादन डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'आधुनिक मराठी काव्यपरंपरा आणि प्रभावक्षमता' या विषयावरील चर्चासत्रात बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उद्घाटनानंतर डॉ. कोत्तापल्ले बोलत होते. चर्चासत्र वि. स. खांडेकर भाषाभवन येथे झाले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस होते.

या चर्चासत्रात मराठीतील नामवंत कवी आणि त्यांच्या प्रभावक्षमतेचा विचार करण्यात आला. केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, नारायण सुर्वे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, अरुण कोल्हटकर, नामदेव ढसाळ या कवींच्या कवितेची मांडणी करण्यात आली. यामध्ये प्रा. अविनाश सप्रे, डॉ. वसंत पाटणकर, डॉ. राजशेखर शिंदे, सतीश काळसेकर या अभ्यासकांनी सहभाग घेतला. या चर्चासत्रासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा आदी परिसरातून साहित्यिकांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानले.